P.S

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>बृहन्मुंबई विभाग, मुंबई,<br>सस्मीरा इमारत, सस्मीरा मार्ग,<br>वरळी, मुंबई ४०० ०३०.<br>दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४, २४९३५४९० | **Public Trusts Registration Office,**<br>**Greater Mumbai Region, Mumbai,**<br>SasmiraBidg, Sasmira Road,<br>Worli, Mumbai - 400 030.<br>Tel No. 24935434, 24935490 |
|---|---|

**जा.क्र. - निरी.०१/684 /२०२२** **दिनांक २५/०१/२०२२**

25 JAN 2022

प्रति,

श्री. महेंद चेंबुरकर,
तत्कालीन सेक्रेटरी,
महाराष्ट्र अम्यॅच्युअर जिम्नॅस्टिकस् असोसिएशन,
३४/डी, चेंबुर गावठाण, मुंबई ४०००७१

**विषय :- न्यासाचे निवडणूकीबाबत...**
**(Maharashtra Amateur Gymnastic Association, F-1403)**

**सदंर्भ**:- १) बदल अर्ज चौ. क्र. Acc (Hosp)/२७३९/२०११ मधील दि.२७/०८/२०२१ रोजीचे आदेश.
२) बदल अर्ज चौ. क्र. Dycc/२५२९/२०१५ मधील दि.२७/०८/२०२१ रोजीचे आदेश.
३) बदल अर्ज चौ. क्र. Dycc/५१११/२०१७ मधील दि.२७/०८/२०२१ रोजीचे आदेश.
४) बदल अर्ज चौ. क्र. Dycc/३५७१/२०१९ मधील दि.२७/०८/२०२१ रोजीचे आदेश.
५) बदल अर्ज चौ. क्र. Dycc/४४२२/२०१९ मधील दि.२७/०८/२०२१ रोजीचे आदेश.
६) या कार्यालयाचे पत्र जा. क्र. निरी.१/७८८७/२०२१, दि.२३.११.२०२१ रोजीचे पत्र.
७) निरीक्षक-१ यांची दिनांक २४.०१.२०२२ रोजीची टिपणी व त्यावरील मा. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २५.०१.२०२२ रोजीचे आदेश.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सदंर्भ क्र. १ ते ५ प्रकरणांमधील आदेशान्वये वरील न्यासाची निवडणूक घेणेबाबत निरीक्षक यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तथापि, निवडणूक घेणेकामी वरील संस्थेच्या सभासद यादीची आवश्यकता आहे. त्यामुळे संदर्भ क्र.७ अन्वये मा. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे दि.२४.०१.२०२२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर दि.२५.०१.२०२२ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

"बदल अर्ज क्र.ACC(Hosp)/१३५३/२०१० निकाल दि.०८.०२.२०११ या असलेल्या कार्यकारणीने संस्था नोंदणी कायदा नियम, १९७१ अन्वये नियम १५ अन्वये Sch.VI नुसार सादर केलेली अधिकृत सभासद यादी व सभासद नोंदवही ८ दिवसांच्या आत न चुकता सादर करावी."

तथापि, सदर संस्थेची घटना पाहिली असता, **घटनेतील कलम २१ मध्ये "Functions of the office bearers" मधील अनुक्रमांक ४ कडे "The Secretary General"** या मुद्दामधील "D" कडे सभासद **नोंदवही ठेवणे व अद्ययावत करण्याची जबाबदारी आपली असल्याचे** दिसुन येते. मा. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई यांनी टिपणीवरील आदेशामध्ये नमुद केलेला बदल अर्ज क्र. **ACC(Hosp)/१३५३/२०१०** या बदल अर्जामधील निशाणी १ ची पाहणी केली असता, सन २००४ ते २००८ या कालावधीसाठी निवडण्यात आलेल्या कार्यकारणीमधील नावांचे अवलोकन केले असता, वरील नमुद कालावधीसाठी सेक्रेटरी म्हणून आपल्या नावाची निवड केल्याचे दिसुन येते. त्यामुळे, उपरोक्त निवडणूकीचे कामी वरील आदेशान्वये **Maharashtra Amateur Gymnastic Association, F-१४०८ (मुबई)** या संस्थेची सभासद यादी व सभासद नोंदवही निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर ८ दिवसांचे आत सादर करावी. सबब, आपण आपल्या कर्तव्यामध्ये कसुर केल्यास आपणावर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपला,

(सही) २५/०१/२०२२

निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र
अॅमॅच्युअर जिम्नॅस्टिक असोसिएशन
तथा
निरीक्षक ०१,
सार्वजनिक न्यास नोंदणीकार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई